अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

www.surajyadigital.com

। शनिवार, दि. ७ डिसेंबर २०२४ । ▸ वर्ष : २३ वे ▸ अंक : ६८ वा ▸ किंमत : ५ रुपये ▸ पाने ८




## हिंदूंवरील हल्ले थांबवा : डॉ.इलियासी

**नवी दिल्ली** : ऑल इंडिया इमाम ऑर्गनायझेशनचे प्रमुख इमाम डॉ.ओमर अहमद इलियासी म्हणाले की, बांग्लादेशातील हिंदूंवर होणाऱ्या अत्याचाराचा मी निषेध करतो. भारताने त्यांना नेहमीच पाठिंबा दिला आहे. आजची परिस्थिती लक्षात घेता, तिथे शांतता प्रस्तापित व्हावी. हिंदूंवर होणारे अत्याचार थांबले पाहिजेत. मी मोहम्मद युनूस यांना सांगू इच्छितो की, त्यांनी ताबडतोब गैरप्रकार करणाऱ्यांवर कारवाई करावी. पूर्वोत्तर राज्यातील त्रिपुरा गौसिया समिती या मुस्लिम संघटनेने बांग्लादेशमध्ये भारताच्या राष्ट्रध्वजाचा अपमान करण्याच्या घटना त्वरित थांबविण्याची मागणी केली होती. सनातन धर्म मानणाऱ्या लोकांवर सातत्याने अत्याचार होत आहेत. त्यांची मालमत्ता जाळली जात आहे.

# महायुतीत घमासान... सत्ता वाटणीवरून आदळआपट



## वादग्रस्त चेहरे नकोत



## युतीचा धर्म पाळा

**सोलापूर/विशेष प्रतिनिधी**

**मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सरकारचा शपथविधी पार पडला. त्यात प्रचंड उत्साह होता. फडणवीस-एकनाथ शिंदे आणि अजितदादा यांची एकी तिथे दिसली. शपथविधी सोहळ्यापूर्वी सत्तेच्या वाटणीवरून म्हणजेच मंत्रीपदावरून महायुतीत धुसपूस होती. एकमत होत नव्हते. त्यामुळे सत्तेचा तिढा वाढत गेला. शपथविधीनंतरही तेच दिसत आहे. सत्तेतील पदे देण्या-घेण्यावरून बंद दाराआड ठोसाठोसी सुरू असल्याचे वृत्त आहे.उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे आजही गृहमंत्रीपद देण्याचा भाजपकडे हट्ट धरला आहे.शिंदे यांनी काही जुनी उदाहरणे देवून भाजपला कोंडीत पकण्याचा प्रयत्न चालवला आहे तर भाजप मात्र हे खाते सोडायला तयार नाही. गृह खात्यासाठी भाजपने तीन पर्याय शिंदे यांना दिले आहेत मात्र त्यावर एकमत होत नाहीय. एकंदरीत सत्तेच्या वाटणीवरून महायुतीत घमासान सुरू असल्याचे मुंबईचे वृत्त आहे.**



शपथविधींनतर आता खातेवाटपात कोणाला काय मिळणार याची राज्यात उत्सुकता आहे. मुख्यमंत्रीपदाचा त्याग करणारे शिंदे हे गृह मंत्रालयासाठी आग्रही आहेत. मुख्यमंत्रीपद आणि उपमुख्यमंत्रीपदात बदल झालेला आहे. मग आधीच्या उपमुख्यमंत्र्यांकडे असलेली खातीही आताच्या उपमुख्यमंत्र्यांना मिळावीत, अशी शिवसेनेची मागणी आहे. शिंदे मुख्यमंत्री असताना फडणवीस यांच्याकडे गृह मंत्रीपदाचा कार्यभार होता. आता शिंदे यांच्याकडे उपमुख्यमंत्रीपद आल्याने त्यांना गृहमंत्रीपद दिले जावे, यासाठी सेना आग्रही आहे. गृह मंत्रालयाची मागणी करताना शिवसेनेकडून युती सरकारच्या काळातील फॉर्म्युल्याची आठवण करुन दिली जात आहे. १९९५ मध्ये राज्यात पहिल्यांदा शिवसेना-भाजप युतीचे सरकार आले. त्यावेळी सेनेचे मनोहर जोशी मुख्यमंत्री झाले. तर उपमुख्यमंत्रीपद भाजपच्या गोपीनाथ मुंडेंकडे गेले. त्याच युती पॅटर्नचे स्मरण सेनेकडून करुन दिले जात आहे.

आघाडी सरकारच्या काळातही कायम उपमुख्यमंत्री असलेल्या पक्षाच्या नेत्याकडेच गृह विभाग राहिला. काँग्रेसचे विलासराव देशमुख मुख्यमंत्री असताना राष्ट्रवादीच्या छगन भुजबळांनी गृह विभाग सांभाळला. काँग्रेसचे सुशीलकुमार शिंदे मुख्यमंत्री झाल्यावर राष्ट्रवादीचे आर.आर. पाटील गृहमंत्री होते. काँग्रेसच्या अशोक चव्हाणांनी मुख्यमंत्रीपदाची सूत्रे हाती घेतल्यावर जयंत पाटील गृह मंत्री झाले. त्यानंतर काँग्रेसचे पृथ्वीराज चव्हाण मुख्यमंत्री झाल्यावर राष्ट्रवादीचे आर. आर. पाटील यांच्याकडे गृह मंत्रालयाचा कार्यभार होता.

युती, आघाडीच्या काळात कधीच मुख्यमंत्री असलेल्या पक्षाकडे गृह मंत्रालयाचा कार्यभार राहिलेला नाही. पण २०१४ मध्ये देवेंद्र फडणवीस यांनी हा पायंडा मोडला. त्यांनी मुख्यमंत्रीपदासह गृह मंत्रालय स्वत:कडे ठेवले. पाच वर्षे त्यांच्याकडेच गृह मंत्रालयाची जबाबदारी राहिली. आताही भाजप तोच पॅटर्न राबवण्याच्या तयारीत आहे. तसे झाल्यास भाजप सेनेला जास्त वरचढ ठरेल.हा सारा इतिहास समोर आणून शिंदे यांनी फडणवीस यांना युतीचा धर्म पाळण्याचा सल्ला दिला आहे.

### भाजपात मंत्रीपदांसाठी भलीमोठी यादी, कोण तयार होणार बलिदानासाठी?

भाजपचे १३२ आमदार असल्याने मंत्रीमंडळात त्यांच्या आमदारांची संख्या सर्वाधिक असेल. शिंदे सरकारमध्ये भाजपचे केवळ १० मंत्री होते. तर पक्षाच्या आमदारांची संख्या १०५ इतकी होती. त्यामुळे अनेकांना मंत्रीपदाची लॉटरी लागलीच नाही. ही सगळी आमदार मंडळी आता मंत्रीपदासाठी इच्छुक आहेत. त्यांची यादी तशी बरीच मोठी आहे. तितकीच उत्सुकता विधानसभा अध्यक्ष आणि प्रदेशाध्यक्ष पदावर कोणाची वर्णी लागणार याबद्दल आहे. पक्षाची सत्ता आल्यावर सगळ्यांना सरकारमध्ये जाण्यात रस असतो.महायुतीत तीन पक्ष आहेत.त्यामुळे भाजपमधील बोहल्यावर चढून बसलेल्या साऱ्या नवरदेवांना मंत्रीपदे मिळण्याची शक्यता कमीच आहे. कुणाचा तरी बळी द्यावा लागणार आहे पण बलिदान देण्यास कुणाचीच तयारी नसल्याने फडणवीस यांना सत्तेची वाटणी करताना मोठे चॅलेंज असणार आहे.

### भाजपकडून शिंदेंना ३ पर्याय

गृह विभाग फडणवीस हे कायम स्वत:कडे ठेवत आले आहेत. २०१४ ते २०१९ या कालावधीत फडणवीस मुख्यमंत्री होते. तर २०२२ ते २०२४ या कालावधीत फडणवीस यांच्याकडे उपमुख्यमंत्रीपद होते. या दोन्ही वेळा फडणवीसांकडे गृह मंत्रालयाचा कार्यभार होता. सत्तेत असताना फडणवीस गृह विभाग आपल्याकडेच ठेवतात हा इतिहास आहे. आताही ते शिंदेंसाठी गृह विभाग सोडण्यास तयार नसल्याचे समजते. गृह विभागाच्या ऐवजी भाजपने शिवसेनेला तीन पर्याय दिले आहेत. या तीनपैकी एका खात्याची निवड करा, असे भाजपकडून शिवसेनेला सांगण्यात आले आहे. महसूल, जलसंपदा, सार्वजनिक बांधकाम असे तीन पर्याय भाजपने दिले आहेत. ऊर्जा, गृहनिर्माण मंत्रालय शिवसेनेला सोडण्याची भाजपची तयारी नाही.


### ते पुन्हा मंत्रीपदी नकोत! तिघांचा पत्ता कट होणार?

मंत्रीमंडळात वादग्रस्त, भ्रष्टाचाराचे आरोप असलेले चेहरे नकोत, अशी स्पष्ट सूचना भाजपकडून सेनेला करण्यात आली आहे. त्यामुळे शिवसेनेत अस्वस्थता आहे. भाजप २४ मंत्रीपदे स्वत:कडे ठेवेल अशी शक्यता आहे. शिवसेनेला १०, राष्ट्रवादी काँग्रेसला ९ मंत्रीपदे मिळू शकतात. भ्रष्टाचाराचे आरोप असलेल्या नेत्यांची शिफारस मंत्रीपदांसाठी करु नका, अशी स्पष्ट आणि स्वच्छ सूचना भाजपकडून करण्यात आली आहे.भाजपने तानाजी सावंत, संजय राठोड, अब्दुल सत्तार या तिघांची नावे घेतल्याचे सांगण्यात येते. भाजपची सूचना म्हणजे सेनेच्या निर्णय प्रक्रियेत ढवळाढवळ असल्याचे सेनेला वाटते. राष्ट्रवादी काँग्रेसच्या कित्येक नेत्यांवर भ्रष्टाचाराचे आरोप आहेत. त्यांच्या पक्षाचे अध्यक्ष आणि उपमुख्यमंत्री अजित पवारांवरच कित्येक गंभीर आहेत. मग ते मंत्रीमंडळात कसे चालतात, असा सेना नेत्यांचा सवाल आहे.

## गटनेते पदासाठी काँग्रेसमध्ये रस्सीखेच

**मुंबई/प्रतिनिधी**

विधानसभेत महाविकास आघाडीला विरोधी बाकावर बसावे लागणार हे स्पष्ट होताच उद्धव बाळासाहेब ठाकरे सेनेने आमदार भास्कर जाधव तर शरद पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसने जितेंद्र आव्हाड यांची गटनेता म्हणून नियुक्ती केली. दुसरीकडे सोळा आमदार असलेल्या काँग्रेसने अद्याप गटनेता निवडलेला नाही. यावरून काँग्रेसमध्ये मोठी रस्सीखेच सुरू असल्याचे समजते.



काँग्रेसचे विधिमंडळाचे नेते बाळासाहेब थोरात, माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांचा विधानसभेच्या निवडणुकीत धक्कादायक पराभव झाला आहे. निवडून आलेल्या सोळा आमदारांपैकी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले आणि माजी विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांचा समावेश आहे. विशेष म्हणजे नाना पटोले थोडक्यात वाचले.

ईव्हीएममध्ये ते पराभूत झाले होते. मात्र टपाल मतांनी त्यांना तारले. अवघ्या २५० मतांच्या फरकाने ते निवडून आले आहेत. त्यांच्याच नेतृत्वात काँग्रेसने निवडणूक लढली होती. त्यामुळे पराभवाचे खापरसुद्धा त्यांच्या फोडण्यात येत आहे. आता मात्र राजकीय परिस्थिती बदलली आहे. हे बघता अनुभव, आक्रमकता आणि विरोधी पक्षनेतेपदाचा अनुभव असलेले विजय वडेट्टीवार यांचे नाव काँग्रेसचे गटनेते म्हणून आघाडीवर असल्याचे समजते. अमित देशमुख यांचेही नाव एका गटाकडून रेटले जात असल्याचे वृत्त आहे.

## शहाजीबापू पाटलांच्या कार्यालयासमोर दगडफेक

### पुण्याची फॉर्च्युनर फोडली; शिवसैनिक संतप्त

**सांगोला/प्रतिनिधी**

सांगोला मतदारसंघात माजी आमदाराच्या कार्यालयासमोर लावण्यात आलेल्या फॉर्च्युनर कारवर दगडफेक करण्यात आल्याची घटना घडल्याने शहरात तणाव निर्माण झाला आहे. काय झाडी, डोंगार, काय हाटील फेम माजी आमदार शहाजीबापू पाटील यांच्या पुतण्याच्या कारवर अज्ञाताने दगडफेक केल्याने शिवसेनेचे कार्यकर्ते संतप्त झाले आहेत.

माजी आमदार शहाजी बापू पाटील यांच्या सांगोला येथील कार्यालयासमोर शुक्रवारी दुपारी त्यांचे पुतणे सागर पाटील यांची गाडी अज्ञात तरुणाने दगड मारून फोडली. विशेष म्हणजे या वेळेला कार्यालयात बापूंचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित असताना हा प्रकार घडला. मात्र, दगड मारणारा तरुण पळून गेल्याने आता सीसीटीव्हीच्या सहाय्याने पोलिसांकडून त्याचा शोध घेतला जात आहे. शहाजी बापू पाटील हे कार्यालयात नसताना हा प्रकार घडला असून पदाधिकारी व कार्यकर्ते चांगलेच संतापले आहेत. तसेच, शिवसेना स्टाईलने उत्तर देऊ, असेही कार्यकर्त्यांनी सोशल मीडियातून म्हटलं आहे.




### शिवसैनिकांमध्ये संतप्त, करारा जबाव मिलेगा

जाहीर निषेध... करारा जबाव मिलेगा. सांगोल्यात सागर पाटील यांच्यावर जो भ्याड हल्ला करण्याचा प्रयत्न करण्यात आला त्याचा निषेध सर्वत्र केला जात आहे. पोलीस प्रशासनाला विंनती आहे की, लवकरात लवकर कठोर कारवाई करावी. अन्यथा शिवसेनेच्या वतीने हल्लेखोरांना शिवसेना स्टाईलने उत्तर दिले जाईल , अशी सोशल मीडिया पोस्ट पाटील समर्थकांकडून करण्यात आली आहे. त्यामुळे, या हल्लामागे नेमकं कोण आहे, गाडीच्या काचेवर दगड कोणी मारला, याचा तपास पोलिसांकडून सुरू असून लवकरच उलगडा होण्याची शक्यता आहे.

## महापालिका राबविणार १०० दिवसांची टीबीमुक्त भारत मोहीम

### सोलापुरात आजपासून मोहिमेस होणार प्रारंभ

**सोलापूर/प्रतिनिधी**

पंतप्रधान यांच्या महत्वकांक्षी योजनेनुसार संपूर्ण भारत देशातून सन २०२५ अखेर पर्यंत क्षयरोगाला हददपार करण्याचे उद्दिष्ट आहे. त्या अनुषंगाने राष्ट्रीय क्षयरोग दुरिकरण कार्यक्रमांतर्गत सोलापूर महापालिका १०० दिवसांची टीबीमुक्त भारत मोहीम राबविणार आहे.

त्या अनुषंगाने राष्ट्रीय क्षयरोग दुरिकरण कार्यक्रमांतर्गत देशातील ३४७ उच्च प्राथमिकता असलेल्या जिल्हयांमध्ये १०० दिवसीय क्षयरोग मोहिम, निक्षय शिबीरे आयोजीत करण्याची योजना केंद्रीय आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालयाने तयार केली आहे. त्यामध्ये महाराष्ट्रातील ३० जिल्हयांची निवड करण्यात आलेली आहे. यामध्ये सोलापूर मनपा कार्यक्षेत्राची निवड करण्यात आलेली आहे. केंद्रिय आरोग्यमंत्री यांच्या हस्ते दि.७ डिसेंबर रोजी या मोहिमेचा संपूर्ण देशामध्ये शुभारंभ करण्यात येणार आहे. सोलापुरात या मोहिमेची सुरुवात दि.७ डिसेंबर रोजी साबळे वाघिरे प्रा. लि. योगेश्वर नगर, जुना विडी घरकूल हैद्राबाद रोड, सोलापूर येथे सकाळी १० वाजता आमदार विजयकुमार देशमुख यांच्या हस्ते व मनपा आयुक्त, उपायुक्त, आरोग्याधिकारी, शहर क्षयरोग अधिकारी व शहर क्षयरोग केंद्राकडील कर्मचारी यांच्या उपस्थितीत करण्यात येणार आहे.



## संसदेत यापूर्वी कधी सापडली होती कॅश... अमरसिंह यांना झाला होता तुरूंगवास

**नवी दिल्ली** : संसदेच्या चालू हिवाळी अधिवेशनात शुक्रवारी राज्यसभेतून एक धक्कादायक प्रकार समोर आला. ज्यामुळे देशातील राजकारण ढवळून निघाले आहे. राज्यसभेचे कामकाज सुरू असताना काँग्रेसचे खासदार अभिषेक मनु सिंघवी यांच्या आसनापाशी पैशांचे बंडल सापडल्याने राजकीय क्षेत्रात खळबळ उडाली आहे. यावरून सत्ताधारी भाजप आणि विरोधी पक्षात असलेली काँग्रेस यांच्यात मोठा संघर्ष होण्याची चिन्हे दिसत आहेत. या सर्व प्रकरणावर स्पष्टीकरण देताना अभिषेक मनु सिंघवी यांनी सांगितले की, ते संसदेत जाताना पाचशे रुपयांपेक्षा जास्त पैसे घेऊन जात नाहीत.


या सर्व प्रकरणामुळे राज्यसभेत गदारोळ सुरू झाल्यानंतर सभापती जगदीप धनखड यांनी या प्रकरणाची चौकशी करण्याचे आदेश दिले आहेत. पण संसदेच्या सभागृहात पैशे सापडण्याचा हा प्रकार पहिल्यांदा घडला नसून, यापूर्वीही संसदेत अनेकवेळा असे प्रकार घडले आहेत.

### न्यूक्लिअर करारनंतर काय घडले होते?

मनमोहन सिंग यांच्या पहिल्या कार्यकाळात २००८ मध्येही असाच प्रकार समोर आला होता. त्यावेळी संयुक्त पुरोगामी आघाडी सरकारने अमेरिकेसोबत न्यूक्लिअर करार केला होता. यानंतर कम्युनिस्ट पार्टी ऑफ इंडियाने (एम) मनमोहन सिंह सरकारचा पाठिंबा काढून घेतला. अशात भाजपाने सरकारविरोधात अविश्वास प्रस्ताव आणला. त्यावेळी या अविश्वास प्रस्तावावर संसदेत बरीच चर्चा झाली. मात्र मतदानाची वेळ आली तेव्हा तत्कालीन लोकसभा अध्यक्ष सोमनाथ चॅटर्जी यांच्या टेबलावर भाजपाचे अशोक अरगल, फगन कुलस्ते आणि महावीर या खासदारांनी नोटा ठेवल्या.

१९९३ साली केंद्रात नरसिंह राव यांचे सरकार होते. पण, त्यांच्याकडे स्पष्ट बहुमत नव्हते. बाबरी मशिद पाडल्यानंतर पक्षातील नेते राव यांच्या विरोधात गेले होते. याचबरोबर नरसिंह राव आणि अर्जुन सिंह यांच्यातील मतभेदही वाढल्याच्या बातम्या सातत्याने वर्तमानपत्रात येत होत्या. अशात भाजपाने नरसिंह राव सरकारच्या विरोधात अविश्वास प्रस्ताव आणला. नरसिंह राव यांच्याकडे त्यावेळी २४४ खासदार होते. पण अविश्वास प्रस्तावावर मतदान झाल्यावर त्यांना २६५ मते मिळाली आणि त्यांचे सरकार वाचले.

दरम्यान १९९६ मध्ये झारखंड मुक्ती मोर्चाचे खासदार सूरज मंडल यांनी दावा केला होता की, १९९३ मध्ये पैसे वाटल्यामुळे नरसिंह राव यांचे सरकार वाचले होते. त्यांनी सांगितल्याप्रमाणे प्रत्येक खासदाराला ४० लाख रुपये देण्यात आले होते. हे प्रकरण पुढे सर्वोच्च न्यायालयात गेले होते, पण सर्व आरोपींची निर्दोष मुक्तता करण्यात आली होती. भाजपाच्या या तिन्ही खासदारांनी हे पैसे त्यांना समाजवादी पक्षाचे नेते अमर सिंह यांनी क्रॉस व्होटिंग करण्यासाठी दिल्याचा आरोप केला होता. त्यावेळी सरकारला २६८ मते मिळाली तर विरोधी पक्षांना २६३ मते मिळाली होती. या प्रकरणी अमर सिंह यांना तुरुंगवासही झाला होता. पण, त्यांच्यावर कोणतीही कठोर कारवाई झाली नाही.





## तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



त्यांनी शप्पथ घेतली, आता तुमची राहिलीय!!

| कल्याण |
| --- |
| 156-21-489 |

| मुंबई |
| --- |
| 249-52-147 |